जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २५९ | शनिवार, १८ एप्रिल २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## संक्षिप्त

### राज्यात उष्णतेच्या लाटेमुळे नागरिक हैराण

**पुणे, ता. १७ :** महाराष्ट्रात सध्या उन्हाचा तडाखा प्रचंड वाढला असून आज, १७ एप्रिल रोजी राज्यातील २३ जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात तापमानाचा पारा ४० ते ४४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहण्याचा अंदाज आहे. विशेषतः अकोला, सोलापूर आणि जळगाव यांसारख्या शहरांमध्ये तापमानाने उच्चांक गाठला असून नागरिकांना दुपारच्या वेळी घराबाहेर न पडण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. कोकण किनारपट्टीवर तापमानाचा पारा जरी ३५ अंशांच्या आसपास असला तरी हवेतील आर्द्रतेमुळे प्रचंड उकाडा आणि दमट हवामान जाणवत आहे. मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यांसाठी हवामान विभागाने उष्ण आणि दमट हवामानाचा 'यलो अलर्ट' जारी केला आहे. यामुळे मुंबईकरांच्या अंगाची लाहीलाही होत असून घामामुळे नागरिक हैराण झाले आहेत.

# ग्रामपंचायत फेररचनेवरून पुण्यात राजकीय हालचालींना वेग


## ७५४ ग्रामपंचायतींच्या पुनर्रचनेतून राष्ट्रवादीच्या वर्चस्वाला आव्हान?

**पुणे, ता. १७ :** देशात सध्या नारीशक्ती वंदन घटनादुरुस्ती विधेयकावर चर्चा सुरू असताना पुणे जिल्ह्यात मात्र ७५४ ग्रामपंचायतींच्या प्रभाग फेररचनेची चर्चा रंगली आहे. या फेररचनेमुळे येत्या ग्रामपंचायत निवडणुकांवर मोठा परिणाम होणार असल्याने राजकीय वातावरणही तापले आहे.

अलीकडेच झालेल्या पुणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने सर्वाधिक जागा जिंकल्या. त्यामुळे जिल्ह्यात त्यांचा दबदबा कायम असल्याचे दिसून आले. भाजप दुसऱ्या स्थानावर राहिला. आता भाजप गावपातळीवर आपली ताकद वाढवण्यासाठी नवीन योजना आखत असल्याची चर्चा आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये काही प्रमाणात अस्वस्थता निर्माण झाली आहे.

लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनंतर आता डिसेंबरमध्ये पुणे जिल्ह्यातील ७५४ ग्राम पंचायतींचा कार्यकाळ संपणार आहे. त्यामुळे त्याआधी प्रभागांची फेररचना केली जात आहे. जिल्हा प्रशासनाने यासाठी प्रारूप मसुदा तयार केला आहे. लोकसंख्या वाढ आणि भौगोलिक बदल लक्षात घेऊन नवीन रचना करण्यात येत आहे. या म सुद्यावर नागरिकांकडून हरकती आणि सूचना देखील मागवण्यात आल्या आहेत. हा आराखडा लवकरच राज्य निवडणूक आयोगाकडे पाठवला जाणार आहे.

या प्रक्रियेत पुणे शहराजवळील काही गावांमध्ये मोठे बदल होणार आहेत. हवेली तालुक्यातील २३ गावांचा पुणे महापालिकेत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या परिसरातील ग्रामपंचायतींची फेररचना मोठ्या प्रमाणावर होणार आहे. याचा स्थानिक राजकारणावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.




जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे वर्चस्व दिसून आले. अजित पवार गट आणि शरद पवार गट अनेक ठिकाणी एकत्र लढले, त्याचा फायदा त्यांना झाला. भाजप दुसऱ्या स्थानावर राहिला. शिवसेना (ठाकरे) गटाने शिंदे गटापेक्षा चांगली कामगिरी करत तिसरे स्थान मिळवले. काँग्रेसला मात्र एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. त्यामुळे जिल्ह्यात राष्ट्रवादीचे वर्चस्व कायम असल्याचे चित्र आहे.

याच पार्श्वभूमीवर भाजप आता फेररचनेच्या माध्यमातून आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. प्रभाग रचनेत बदल झाल्यास काही ठिकाणी नवीन संधी मिळू शकते, असा त्यांचा अंदाज आहे. त्यामुळे या प्रक्रियेकडे सर्व पक्षांचे लक्ष लागले आहे.

मुळशी तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने चांगली कामगिरी केली. जिल्हा परिषदेच्या ३ पैकी २ आणि पंचायत समितीच्या ६ पैकी ३ जागा त्यांनी जिंकल्या. मात्र हिंजवडी भागात भाजपला यश मिळाले. त्यामुळे आता भाजप मुळशीत आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे.

पुरंदर आणि भोरमध्येही राजकीय घडामोडी बदलल्या आहेत. काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप आणि संग्राम थोपटे यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने समीकरणे बदलली. आता या भागात ग्रामपंचायतींच्या माध्यमातून भाजप आपली ताकद वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. मावळ तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसने मोठा विजय मिळवला. जिल्हा परिषदेच्या ५ आणि पंचायत समितीच्या १० जागा त्यांनी जिंकल्या. भाजपला येथे एकही जागा मिळाली नाही. त्यामुळे भाजप आता येथे पुन्हा उभे राहण्यासाठी प्रयत्न करत आहे.

इंदापूर तालुक्यातही राष्ट्रवादीला मोठे यश मिळाले. भाजपला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्यामुळे येथेही ग्रामपंचायतींच्या माध्यमातून नव्याने संघटन उभारण्याचे नियोजन सुरू आहे. दौंड तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सर्व जागा राष्ट्रवादीला मिळाल्या. भाजपला येथे मोठा फटका बसला. मात्र पंचायत समितीत काही जागा मिळाल्याने त्यांना थोडा दिलासा मिळाला आहे. आता ग्राम पंचायतींमध्ये ताकद वाढवण्यावर त्यांचा भर असेल.

दरम्यान, एकूणच, पुणे जिल्ह्यातील ७५४ ग्रामपंचायतींच्या फेररचनेमुळे राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रक्रियेकडे सर्व पक्षांचे लक्ष लागले असून पुढील निवडणुकांसाठी ही फेररचना महत्त्वाची ठरणार आहे.



### प्राजक्त तनपुरे भाजपमध्ये जाणार असल्याची चर्चा?

**राहुरी, ता. १७ :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटातील दिग्गज नेते प्राजक्त तनपुरे यांच्या राजकीय भूमिकेबाबत सध्या चर्चांना उधाण आले आहे. येत्या २० एप्रिल रोजी ते आपला अंतिम निर्णय जाहीर करणार असल्याने त्यांच्या भाजप प्रवेशाची शक्यता वर्तवली जात आहे. राहुरी विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीची पार्श्वभूमी असताना तनपुरे यांनी उमेदवारी अर्ज भरण्याच्या अगोदरच माघार घेतली. त्याआधी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी त्यांची भेट घेतली होती. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशीही त्यांचा दूरध्वनीवर संवाद झाल्याची माहिती आहे. या घडामोडीनंतर तनपुरे यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याने भाजपचे उमेदवार अक्षय कर्डीले यांचा विजयाचा मार्ग मोकळा झाला. त्यानंतर तनपुरे भाजपमध्ये प्रवेश करणार का, याबाबत चर्चांना उधाण आले आहे. तनपुरे यांनी २० एप्रिल रोजी कार्यकर्त्यांचा मेळावा बोलावला आहे.

# कुंजीरवाडी येथे कोचिंग क्लासला गेलेल्या अल्पवयीन मुलीचे अपहरण

**लोणी काळभोर, ता. १७ :** एका खाजगी कोचिंग क्लासला गेलेल्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेल्याची घटना कुंजीरवाडी (ता. हवेली) हद्दीत घडली आहे. याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाच्या विरोधात फिर्याद दिली आहे. ही घटना मंगळवारी (ता. १४) सकाळी १० ते साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांची मुलगी १४ वर्षे ६ महिन्यांची असून ही कुंजीरवाडी परिसरातील एका बड्या विद्यालयात नववीत शिकते. ती दररोज सकाळी किंवा संध्याकाळी कुंजीरवाडी येथील एका खासगी क्लास जात होती. मंगळवारी



शाळेला सुट्टी असल्याने क्लास सकाळी दहा ते साडेअकरा या वेळेत होता. सकाळी ९ वाजून ५० मिनिटांनी मुलीचा भाऊ तिला रिक्षामधून क्लासला सोडण्यासाठी गेला होता.

बहिणीला क्लासच्या बाहेर सोडले आणि क्लास सुटल्यावर तिला घेऊनच घरी जाण्यासाठी तो तिथेच थांबला. सकाळी ११ वाजता क्लास सुटल्यानंतर सर्व मुले बाहेर आली, मात्र त्याची बहिण कुठेच दिसली नाही. भावाने क्लासमध्ये जाऊन शिक्षकांकडे चौकशी केली असता, त्याची बहिण क्लास आलीच नाही, असे सांगण्यात आले. भावाचे लक्ष नसल्याची संधी साधून बहिण तिथून बेपत्ता झाल्याचे समोर आले.

मुलाने सदरची माहिती तात्काळ आपल्या वडिलांना फोन करून दिली. मुलीच्या कुटुंबाने कुंजीरवाडी गाव, आजूबाजूचा परिसर आणि सर्व नातेवाईकांकडे मुलीचा शोध घेतला, परंतु तिचा कुठेही पत्ता लागला नाही.

अखेर, अज्ञान वयाचा फायदा घेऊन कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेल्याची खात्री पटल्यानंतर वडिलांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात धाव घेतली.

दरम्यान, याप्रकरणी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे कुंजीरवाडी परिसरात खळबळ उडाली असून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे करीत आहेत.

# शासकीय कर्मचाऱ्यांना आता मिळणार आधुनिक आणि हायटेक मोठी घरे

**पुणे, ता. १७ :** राज्यातील शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी शासकीय निवासस्थानांच्या चटई क्षेत्रफळात वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे आता सरकारी कर्मचाऱ्यांना अधिक प्रशस्त, आधुनिक आणि सुसज्ज घरांमध्ये राहण्याची संधी मिळणार आहे.

या नव्या निर्णयानुसार सातव्या वेतन आयोग आणि वेतनगटांच्या आधारे निवासस्थानांचे क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले आहे. टाईप- ते टाईप-ऋ अशा विविध श्रेणीतील घरांचा समावेश करण्यात आला असून, उच्च वेतनगटातील




अधिकाऱ्यांसाठी २४० चौ.मी. पर्यंत आणि निम्न वेतनगटातील कर्मचाऱ्यांसाठी किमान ४५ चौ.मी. पर्यंत जागा निश्चित करण्यात आली आहे. नवीन आराखड्यात बैठकीची खोली, भोजनकक्ष, शयनकक्ष, स्वयंपाकघर, स्वच्छतागृह आणि बाल्कनी यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच काही घरांमध्ये कार्यालयीन कक्ष, अभ्यासिका आणि सेवक कक्ष यांचाही समावेश असेल. यामुळे राहणीमान अधिक सोयीस्कर आणि दर्जेदार होणार आहे.

याशिवाय प्रत्येक खोलीत इंटरनेट आणि दूरध्वनी सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. बहुमजली इमारतींमध्ये जिने, कॉरिडॉर आणि इतर सामाईक सुविधा स्वतंत्रपणे नियोजित केल्या जाणार आहेत.

हा निर्णय फक्त नव्याने सुरू होणाऱ्या बांधकाम प्रकल्पांसाठी लागू असणार आहे. सध्या बांधकामाधीन किंवा आधीच पूर्ण झालेल्या निवासस्थानांवर याचा परिणाम होणार नाही. तसेच आधी वाटप झालेल्या घरांच्या श्रेणीत कोणताही बदल केला जाणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# खेडमध्ये चेडा-करणीच्या नावाखाली कुटुंब फोडण्याचा प्रयत्न

**पुणे, ता. १७ :** नाशिकमधील अशोक खरात प्रकरणानंतर राज्यात अंधश्रद्धेचे प्रकार पुन्हा समोर येऊ लागले आहेत. त्यातच आता पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यात आणखी एक धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. खेड येथील मंदोशी परिसरात चेडा, करणी आणि भूतबाधेची भीती दाखवत एका कुटुंबात फुट पाडण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणात किसन तळपे आणि मंगेश कारोटे या दोन कथित भगतांवर गंभीर आरोप आहेत. दोघांनी संगनमताने कुटुंबीयांच्या मनात भीती निर्माण करून त्यांचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जात आहे.



समोर आलेल्या ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार, घरात चेडा आणून ठेवला आहे, जागरण करून तो कुटुंबात सामील करावा लागेल, अशा भीतीदायक गोष्टी सांगून कुटुंबीयांना मानसिकदृष्ट्या त्रस्त करण्यात आले. तसेच घरासमोर थडगे असल्याचा बनाव करून अघोरी विधी करण्यास भाग पाडण्याचाही प्रयत्न झाला.

एकाची पोळी भाजली जाईल, बाकीच्यांची करपून जाईल, अशा विधानांतून कुटुंबात मतभेद निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यासोबतच तांदूळ, प्रसाद, अंगारा अशा गोष्टींचा वापर करून दैवी शक्तीचा खोटा आभास निर्माण करण्यात आला. या प्रकारामुळे संबंधित कुटुंब मोठ्या मानसिक तणावाखाली आले आहे. सोशल मीडियावर ऑडिओ व्हायरल झाल्याने त्यांची बदनामीही झाल्याची तक्रार करण्यात आली आहे. या प्रकरणी खेड उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून पुढील चौकशी सुरू आहे.

या घटनेमुळे अंधश्रद्धेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अशा भोंदूंच्या विरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी होत असून नागरिकांनीही सतर्क राहून अशा प्रकारांपासून दूर राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# सोरतापवाडी परिसरात जिओ, एअरटेलची सेवा विस्कळीत; पैसे भरूनही ग्राहकांना मनस्ताप

**उरुळी कांचन, ता. १७ :** सोरतापवाडी, नायगाव, पेठ, कोरेगाव मूळ हद्दीतील इनामदारवस्ती परिसरातील नागरिकांना सध्या मोबाईल नेटवर्कच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या भागात वीज पुरवठा खंडित झाला की, तातडीने जिओ आणि एअरटेल यांसारख्या कंपन्यांचे टॉवरही बंद पडत आहेत. टॉवर चालवण्यासाठी बॅकअप म्हणून असलेले जनरेटर चालू केले जात नसल्याने, वीज जाताच मोबाईलचे नेटवर्क पूर्णपणे गायब होत आहे.

मोबाईल कंपन्या ग्राहकांकडून रिचार्जच्या नावाखाली पूर्ण पैसे वसूल करतात. मात्र, सुविधा देण्याच्या बाबतीत या कंपन्या पूर्णपणे अपयशी ठरल्या आहेत. आजच्या डिजिटल युगात बँकिंग, शिक्षण आणि कामासाठी इंटरनेट अनिवार्य आहे. अशात लाईट गेल्यावर नेटवर्कही




बंद होत असल्याने नागरिकांची कामे ठप्प होत आहेत. पैसे भरूनही आम्हाला त्रास का सहन करावा लागतोय? असा संतप्त सवाल सोरतापवाडी, इनामदारवस्ती व परिसरातील ग्राहक विचारत आहेत.

टॉवर कार्यान्वित ठेवण्यासाठी प्रत्येक ठिकाणी जनरेटर किंवा बॅटरी बॅकअप असणे आवश्यक आहे. मात्र, सोरतापवाडी परिसरात वीज गेल्यानंतर हे जनरेटर चालू करण्यासाठी कर्मचाऱ्यांची वानवा असल्याचे किंवा जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप येथील नागरिकांनी केला आहे. अनेक तासनतास लाईट नसल्यावर हा संपूर्ण परिसर 'नो नेटवर्क झोन' मध्ये जात आहे. दरम्यान, नेटवर्क अभावी गुगल पे, फोन पे यांसारखी महत्त्वाची पेमेंट ॲप्स चालत नाहीत. अशावेळी कोणाशीही संपर्क साधणे कठीण होत आहे. वारंवार तक्रार करूनही मोबाईल कंपन्यांचे प्रशासन याकडे लक्ष द्यायला तयार नाही.

याबाबत सोरतापवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल जगताप म्हणाले, जर येत्या काही दिवसांत वीज गेल्यानंतरही नेटवर्क सुरळीत राहील, अशी व्यवस्था मोबाईल कंपन्यांनी केली नाही, तर सोरतापवाडी परिसरातील नागरिक आक्रमक पवित्रा घेण्याच्या तयारीत आहेत. तसेच दोन्ही कंपन्यांच्या कार्यालयावर धडक इशारा देण्यात येईल.

## संक्षिप्त

### पुणे-नाशिकसह अनेक जिल्ह्यांना वादळी पावसाचा इशारा

**पुणे, ता. १७ :** महाराष्ट्र सध्या हवामानाच्या एका विचित्र चक्रात अडकला आहे. राज्याच्या एका टोकाला विदर्भ उन्हाच्या झळांनी होरपळत असताना, दुसऱ्या टोकाला कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात ढगांच्या गडगडाटासह पावसाची चिन्हे दिसू लागली आहेत. भारतीय हवामान विभागाने (IMD) दिलेल्या माहितीनुसार, राज्याच्या तापमानात मोठे चढ-उतार होत असून पुढील काही तास अनेक जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. विदर्भातील जिल्ह्यांमध्ये सध्या उन्हाचा कहर सुरू आहे. अकोला, अमरावती आणि वर्ध्यात पारा ४४ अंशांच्या पलीकडे गेल्याने रस्ते दुपारच्या वेळी ओस पडत आहेत. याउलट, पुणे, नाशिक आणि साताऱ्यात पावसाचे ढग जमा होऊ लागले आहेत. ताशी ३० ते ४० किमी वेगाने वाहणारे वारे आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दक्षिण मराठवाड्यातील लातूर आणि धाराशिवमध्येही पावसाची शक्यता आहे. दरम्यान, पावसाचे वातावरण पाहता शेतकऱ्यांची डोकेदुखी वाढली आहे. पाऊस झाल्यास शेतकऱ्यांना मोठे नुकसान होऊ शकते. शेतकऱ्यांनी आपली काढलेली पिकेसुरक्षित स्थळी हलवावीत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### पिंपरी स्मशानभूमी परिसरात अल्पवयीन मुलाकडून पिस्टल जप्त

**पिंपरी, ता. १७ :** बेकायदेशीररीत्या पिस्टल बाळगल्याप्रकरणी एका अल्पवयीन मुलाला ताब्यात घेण्यात आले असून शस्त्र पुरवणाऱ्या एका व्यक्तीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई बुधवारी (१५ एप्रिल) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पिंपरी स्मशान भूमीसमोरील मोकळ्या जागेत करण्यात आली.पोलीस कॉन्स्टेबल रोहित वाघमारे यांनी या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार एका व्यक्तीसह अल्पवयीन मुलाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गस्तीवर असताना एका अल्पवयीन मुलाकडे ५० हजार ५०० रुपये किमतीची देशी बनावटीची पिस्टल मिळून आली. पोलीस आयुक्तांच्या शस्त्रबंदी आदेशाचा भंग केल्याप्रकरणी त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान त्याने ही पिस्टल एका व्यक्तीकडून आणल्याचे सांगितले. पिंपरी पोलीस तपास करत आहेत.

### पिंपरीमध्ये वाहनांवर कोसळली भिंत

**पिंपरी, ता. १७ :** पिंपरी येथे रस्त्याच्या बाजूला उभ्या केलेल्या वाहनांवर भिंत कोसळली ही घटना गुरुवारी  एप्रिल दुपारी साडेचार वाजता च्या सुमारास घडली.पिंपरी मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून पिंपरी भाजी मंडईकडे जाणाऱ्या रस्त्यावर जीर्ण अवस्थेतील इमारत आहे. या इम ारतीच्या बाजूला वाहने पार्क केली जातात. गुरुवारी दुपारी जीर्ण झालेल्या इमारतीची भिंत अचानक कोसळली. ही भिंत पार्क केलेल्या तीन दुचाकी आणि एका चारचाकीवर पडली. यामध्ये वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच पिंपरी अग्निशमन विभागाचे वाहन घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी अडकलेली वाहने बाजूला काढली. रस्त्याच्या बाजूला घडलेल्या या घटनेमुळे काही वेळ बघ्यांची गर्दी झाली. यामुळे काही काळ वाहतुकीचा खोळंबा झाला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत वाहतूक सुरळीत केली.

# हिंजवडीतील इन्फोसिस बीपीएम कॅम्पसबाबत महिला छळाचे गंभीर आरोप

**पुणे, ता. १७ :** महाराष्ट्रातील आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. नाशिकमधील टीसीएस कंपनीत महिला कर्मचाऱ्यांच्या शोषणाच्या प्रकरणानंतर आता पुण्यातील हिंजवडी येथील इन्फोसिस बीपीएम कॅम्पसबाबत सोशल मीडियावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांपासून द (पूर्वीचे ट्विटर) या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इन्फोसिसच्या पुणे कॅम्पसमध्ये महिला कर्मचाऱ्यांशी गैरवर्तन होत असल्याच्या पोस्ट व्हायरल होत होत्या. या पोस्टमुळे आयटी क्षेत्रात खळबळ उडाली असून, संबंधित प्रकरणाची दखल राज्य सरकारनेही घेतली आहे.




या पार्श्वभूमीवर मंत्री नितेश राणे यांनी कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. जरी या व्हायरल पोस्ट्स नंतर हटवण्यात आल्या असल्या, तरी कंपनीतील अंतर्गत शिस्त, महिला सुरक्षा आणि कामाच्या ठिकाणचे वातावरण याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

दरम्यान, इन्फोसिस कंपनीने याबाबत स्पष्टीकरण देताना सांगितले की, आमच्या संस्थेत कोणत्याही प्रकारच्या भेदभाव किंवा छळवणुकीसाठी झिरो टॉलरन्स धोरण आहे. कर्मचाऱ्यांनी कोणतीही भीती न बाळगता तक्रार करावी, यासाठी आम्ही स्पीक अप उपक्रमाला प्रोत्साहन देतो.

सध्या कंपनीने या प्रकरणाच्या चौकशीसाठी अंतर्गत समिती नेमली असून, सखोल तपास सुरू आहे. या चौकशीनंतरच प्रत्यक्ष परिस्थिती स्पष्ट होणार आहे.

दरम्यान, आयटी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना जर कोणत्याही प्रकारच्या छळाचा सामना करावा लागत असेल, तर त्यांनी कंपनीच्या आयसीसी कडे तक्रार करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, आवश्यक असल्यास दामिनी पथकाची मदतही घेता येऊ शकते.

नाशिकमधील घटनेप्रमाणेच काही प्रकार पुण्यातही घडत होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून, चौकशी अहवालानंतर या प्रकरणातील सत्य समोर येण्याची शक्यता आहे.

### सायबर चोरांकडून दोघांची १ लाख ४४ हजारांची फसवणूक

**सांगवी, ता. १७ :** सांगवी परिसरात दोन पिस्तूल आणि काडतुसांसह दोन तरुणांना अटक बेकायदेशीररीत्या पिस्तूल बाळगणाऱ्या दोन तरुणांना पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई बुधवारी (१५ एप्रिल) पहाटे चार वाजण्याच्या सुमारास जुनी सांगवी येथील औंध जिल्हा रुग्णालयाजवळ करण्यात आली.

साहिल दत्तात्रय साष्टे (१९, कोथरूड, पुणे) आणि साई विठ्ठल वाशिवले (१९, कोथरूड, पुणे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलीस कॉन्स्टेबल आकाश खंडागळे यांनी या प्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन तरुण जुनी सांगवी येथील औंध जिल्हा रुग्णालयाजवळ संशयितपणे फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. आरोपींकडे घातक शस्त्रे असल्याची माहिती मिळाल्यावर ही कारवाई करण्यात आली.

# हडपसरमध्ये टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू

**हडपसर, ता. १७ :** पुणे-सोलापूर महामार्गावर भरधाव टँकरच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना हडपसर परिसरात गुरुवारी (ता. १६) दुपारी पावणे दोन वाजण्याच्या सुमारास घडली आहे. निष्काळजीपणे वाहन चालवत अपघात घडवून आणल्यानंतर चालकाने मदत न करता घटनास्थळावरून पलायन केल्याने संताप व्यक्त केला जात आहे. तर या प्रकरणी दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रतिक अश्विन शेठ (वय ४३, रा. रास्तापेठ, पुणे) असे मृत्यू झालेल्याचे नाव आहे. तर उमेश आनंदराव जाधव व टँकर चालक अविनाश आनंदराव जाधव (वय ३३ रा. शेवाळेवाडी ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा झालेल्या दोघांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रतिक शेठ हे त्यांच्य दुचाकीवरून पुण्याकडून उरुळी कांचनच्या दिशेने जात होते. रविदर्शन बस स्टॉपजवळ पोहोचताच, मागून आलेल्या अशोक लेलँड कंपनीच्या एमएच १२ एचडी ३२७६ क्रमांकाच्या पाण्याच्या टँकरने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.




या धडकेत प्रतिक शेठ रस्त्यावर पडले. मात्र, त्यानंतरही टँकर चालकाने वाहन थांबविण्याऐवजी अधिक वेगाने पुढे नेले. परिणामी, टँकरचे पुढील चाक थेट प्रतिक यांच्या डोक्यावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. हा प्रकार पाहून उपस्थित नागरिकांनी टँकर थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र चालक अविनाश जाधव हा लोकांची नजर चुकवून पळून गेला.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात म ोठी खळबळ उडाली असून नागरिकांम ध्ये संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे, टँकरवर आवश्यक सुरक्षा सुविधा तसेच क्लिनर नसताना वाहन रस्त्यावर आणण्यात आले होते, अशी माहिती समोर आली आहे. यामुळे अपघातास जबाबदार टँकर मालक उमेश जाधव यांच्याविरोधातही गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

या घटनेची माहिती मिळताच हडपसर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. फिर्यादी नितीन बंबोली यांच्या तक्रारीवरून टँकर चालक व मालकाविरोधात महाराष्ट्र मोटार वाहन नियम १९८९ चे कलम १३४, १८४ तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३(५) व १०५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रिलस्टार सोनाली जाधवची प्रियकराकडून निर्घृण हत्या

**पंढरपूर, ता. १७ :** सोशल मीडियाच्या झगमगाटात स्वतः ची ओळख निर्माण करणाऱ्या एका रिलस्टार महिलेची तिच्या वाढदिवसाच्या दिवशीच हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पंढरपूर तालुक्यातील भोसे येथील ३४ वर्षीय सोनाली नेताजी जाधव हिची तिच्याच प्रियकराने गळा दाबून हत्या केली.

सोनालीचे लग्न १६ वर्षांपूर्वी झाले होते, मात्र काही कौटुंबिक कारणांमुळे ती आपल्या पतीपासून वेगळी माहेरी राहत होती. याच काळात तिचे गावातीलच तुकाराम गावंधरे याच्याशी प्रेमसंबंध होते. दरम्यान, सोनाली दुसऱ्या एका मित्राच्या संपर्कात असल्याचे तुकारामच्या निदर्शनास आले आणि तुकारामला प्रचंड राग आला. त्याने सोनालीला वाढदिवसाच्या दिवशी



६ एप्रिल रोजी 'वाढदिवसाचे गिफ्ट' देण्याच्या बहाण्याने दुचाकीवर नेले आणि निर्जन स्थळी तिचा गळा दाबून खून केला.

वाढदिवसाला घराबाहेर पडलेली मुलगी दोन दिवस घरी न परतल्याने वडिलांनी पोलिसांत धाव घेतली. दरम्यान, रोपळे परिसरातील एका कालव्यात पोलिसांना एक कुजलेला मृतदेह सापडला. दरम्यान, तुकारामने गुन्हा कबूल केला असून त्याला अटक केली आहे.

### पुण्यात बिल्डरने फ्लॅट विक्री करून त्यावरच घेतले दोन बँकांचे कर्ज

**पुणे, ता. १७ :** पुण्यातील कोंढवा परिसरात फ्लॅट विक्रीच्या नावाखाली मोठी फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका ४५ वर्षीय महिलेने तब्बल ६० लाख रुपये देऊन फ्लॅटचा ताबा घेतला होता. मात्र त्याच फ्लॅटची दुसऱ्याला विक्री करून दोन बँकांकडून कर्ज घेतल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी निलेश प्रभाकर कामठे, दीपमाला काळे आणि चंद्रकांत संगणाळे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना मे २०१५ ते १८ डिसेंबर २०२५ या कालावधीत घडली.




मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिलेचे पती परदेशात नोकरीला असून त्या पुण्यात दोन मुलांसह राहत आहेत. कोंढव्यातील निर्माण इस्ट्रेला प्रकल्पात त्यांनी ८३२ स्क्वेअर फुटाचा फ्लॅट खरेदी करण्याचे ठरवले. वेळोवेळी ६० लाख रुपये दिल्यानंतर जून २०२३ मध्ये बिल्डरने फ्लॅटची चावी दिली. मात्र रेरा नंबर लॅप्स झाल्याचे कारण देत खरेदीखत केले गेले नाही. महिला फ्लॅटमध्ये राहायला गेल्यानंतर काही दिवसांतच आयसीआयसीआय बँकेचे कर्मचारी आले आणि फ्लॅट तारण ठेवून कर्ज घेतल्याचे सांगत रिकामा करण्याची नोटीस दिली. त्यानंतर नागपूर येथील धरमपेठ बँकेकडूनही कर्ज थकवल्याची नोटीस देण्यात आली.

बिल्डरने आर्थिक अडचणीचे कारण देत कर्ज फेडण्याचे आणि खरेदीखत करून देण्याचे आश्वासन दिले. मात्र ते पूर्ण केले नाही. महिलेचे पती परदेशात असल्याचा फायदा घेत तिची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा तपास नवनाथ जगताप करत असून पोलिसांकडून पुढील कारवाई सुरू आहे.

# दहावी–बारावीच्या निकाल मे महिन्यात लागणार

**पुणे, ता. १७ :** फेब्रुवारी-मार्च महिन्यातील बोर्डाच्या परीक्षांची धाम धूम संपल्यानंतर आता राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या नजरा निकालाकडे लागल्या आहेत. गेल्या महिनाभरापासून निकालाबाबत सुरू असलेल्या तर्कवितर्कांना आता पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. मिळालेल्या ताज्या अपडेटनुसार, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (MSBSHSE) मे महिन्यात लागण्याची शक्यता आहे.

बारावीच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासणीचे काम अंतिम टप्प्यात असून, सध्या गुणांच्या रिपोर्टिंगचे आणि डेटा एंट्रीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात



बारावीचा निकाल लागण्याची दाट शक्यता आहे. दुसरीकडे, दहावीच्या निकालाची प्रक्रियाही वेगात आहे. बारावीचा निकाल लागल्यानंतर दोन आठवड्यांच्या अंतराने, म्हणजेच मे महिन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या आठवड्यात दहावीचा निकाल जाहीर केला जाऊ शकतो.

निकालाची तारीख जवळ येत असताना सोशल मीडियावर अनेकदा अफवा पसरवल्या जातात. विद्यार्थ्यांनी अशा कोणत्याही अनधिकृत तारखांवर विश्वास ठेवू नये. निकाल जाहीर होण्याच्या दोन दिवस आधी बोर्ड अधिकृतपणे वेळ आणि दिनांक जाहीर करते.अधिकृत निकाल पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी mahresult.nic.in, mahahsscboard.in खालील संकेतस्थळांना भेट द्यावी.

# आळंदी म्हातोबाची येथील हर्षद शिंदे याची एव्हिएशन क्षेत्रात दैदिप्यमान कामगिरी

**लोणी काळभोर, ता. १७ :** आळंदी म्हातोबाची (ता. हवेली) येथील हर्षद शांताराम शिंदे यांनी एव्हिएशन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत गावाचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांचा अधिकृत ऑडिटर पॅनलमध्ये समावेश करण्यात आला आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या ब्युरो ऑफ सिव्हिल एव्हिएशन सिक्युरिटी (BCAS) मार्फत सर्टिफाइड ऑडिटर घडविण्यासाठी १३ दिवसांचे विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणात एव्हिएशन सिक्युरिटी नियम, जोखीम मूल्यांकन, ऑडिट प्रक्रिया तसेच प्रात्यक्षिक अंमलबजावणी यांचा सखोल अभ्यास करण्यात आला.




प्रशिक्षणानंतर घेण्यात आलेल्या कठोर लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी १०० पैकी किमान ८० गुण आवश्यक होते. मार्च २०२६ मध्ये पार पडलेल्या या प्रशिक्षणासाठी देशभरातून केवळ १५ उमेदवारांची निवड करण्यात आली होती, त्यापैकी ११ जण यशस्वी ठरले. विशेष म्हणजे, या यशस्वी उमेदवारांमध्ये महाराष्ट्रातून एकमेव हर्षद शिंदे यांचा समावेश असून त्यांनी १०० पैकी ८५ गुण मिळवत देशात तिसरा क्रमांक पटकावला.

या उल्लेखनीय कामगिरीमुळे हर्षद शिंदे यांचा अधिकृत ऑडिटर पॅनलमध्ये समावेश झाला असून, भविष्यात देशातील विविध विमानतळांवर सुरक्षा ऑडिटसाठी त्यांची नियुक्ती होणार आहे. त्यांच्या या यशा मुळे आळंदी म्हातोबाची गावासह संपूर्ण हवेली तालुक्यात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अक्षय तृतीयेनिमित्त पुण्याच्या कुंभारवाड्यात घागरी खरेदीसाठी नागरिकांची गर्दी

**पुणे, ता. १७ :** अक्षय तृतीया सणाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कुंभारवाडा परिसरात मातीच्या घागरी आणि कराकिळी खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी वाढली आहे. सण अवघ्या काही दिवसांवर आल्याने बाजारपेठांमध्ये खरेदीची लगबग दिसून येत आहे.

अक्षय तृतीया हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. या दिवशी घरोघरी पूर्वजांच्या स्मरणार्थ पूजाविधी केले जातात. घागर भरून पूजन करणे, तर्पण विधी करणे यासाठी मातीच्या घागरी आणि त्यावर ठेवण्यात येणाऱ्या करा-किळीचा वापर केला जातो. त्यामुळे सणानिमित्त प्रत्येक घरात नवीन घागर खरेदी करण्याची प्रथा आहे.

या पार्श्वभूमीवर कुंभार समाज मोठ्या प्रमाणात पारंपरिक पद्धतीने घागरी आणि कराकिळी तयार करत आहे. बाजारात विविध आकारातील घागरी आणि करा-किळी उपलब्ध



असून ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे. यंदा कच्च्या मालाच्या किमती वाढल्याने दरात सुमारे २० टक्के वाढ झाली आहे. कराकिळीचा दर प्रति नग ३० रुपये असून दोन नगांसाठी ५० रुपये आकारले जात आहेत. शेकडा दर १३०० ते १५०० रुपयांपर्यंत पोहोचला आहे, जो गेल्या वर्षी १००० ते ११०० रुपये होता.

बाजारात करा आणि किळी असे दोन प्रकार उपलब्ध आहेत. लाल रंगाचा करा पुरुषांच्या पूजेसाठी, तर काळ्या रंगाचा किळी महिलांच्या पूजेसाठी वापरला जातो. कुंभारवाड्यात हे साहित्य होलसेल दरात उपलब्ध असल्याने ग्राहकांची खरेदी वाढली आहे. व्यावसायिक योगेश जामदार यांनी मागणी वाढल्याचे सांगितले आहे.

### पुण्यात भावाकडून बहिणीवर अत्याचार

**पुणे, ता. १७ :** नात्यातील विश्वास, रक्ताची नाती आणि म ाणुसकीला काळिमा फासणारी एक संतापजनक घटना खेड तालुक्यातील चाकण परिसरातून समोर आली आहे. एका अल्पवयीन मुलीवर तिच्याच चुलत भावाने अत्याचार केले आणि हे कृत्य लपवण्यासाठी तिचा बालविवाह करण्यात आला. या प्रकरणी उत्तर चाकण पोलिसांनी किशोर गंगाधर वाईकर (चुलत भाऊ), गंगाधर चिमाजी वाईकर, अविनाश बाळासाहेब गोडे (पती), आण्णा मोरकर आणि आणखी ३ महिलांविरुद्ध 'पोक्सो' आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी आपल्या चुलत भावाच्या घरी त्याच्या गरोदर पत्नीची देखभाल करण्यासाठी गेली होती. मात्र, तिथेच बहिणीला पाहून भावाची नजर फिरली आणि त्याने तिच्यावर अत्याचार केला. फोटो व्हायरल करण्याची आणि जीवे मारण्याची धमकी देऊन त्याने या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केले.

# महिला आरक्षणाचा कायदा त्वरित लागू करा; उद्धव ठाकरेंची मागणी

**मुंबई, ता. १७ :** लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांम ध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारा २०२३ चा कायदा सरकारने त्वरित लागू करावा. मात्र, मतदारसंघांच्या पुनर्रचनेची (सीमांकनाची) प्रक्रिया स्थगित करावी, अशी मागणी ठाकरेसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी केंद्र सरकारकडे केली आहे.

मुंबईत दिलेल्या एका संक्षिप्त निवेदनात ठाकरे म्हणाले, मतदारसंघांची पुनर्रचना हा केवळ एखाद्या राजकीय पक्षाच्या भविष्याचा प्रश्न नसून, तो देशाच्या भविष्याशी संबंधित एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. संसदेने मंजूर केलेला २०२३



चा कायदा त्वरित लागू करा, जो लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण प्रदान करतो.

मात्र, मतदारसंघ पुनर्रचनेची प्रक्रिया सध्या तरी स्थगित केली पाहिजे, कारण हा राष्ट्रीय महत्त्व असलेला विषय आहे. त्यावर अधिक सखोल चर्चेची आवश्यकता आहे, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, संसदेचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन सुरू आहे.

या अधिवेशनात नारी शक्ती वंदन अधिनियमामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि त्याची २०२९ मध्ये अंमलबजावणी करण्यासाठी, तसेच सीमांकन आयोग स्थापन करण्यासाठी मांडण्यात आलेल्या तीन विधेयकांवर चर्चा सुरू झाली आहे. महिला आरक्षण कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठीचे संविधान (१३१ वी सुधारणा) विधेयक गुरुवारी लोकसभेत सादर करण्यात आले.

दरम्यान, दोन सामान्य विधेयके देखील सभागृहात सादर करण्यात आली. संविधान सुधारणा विधेयकानुसार, लोकसभेच्या जागांची संख्या सध्याच्या ५४३ वरून वाढवून जास्तीत जास्त ८५० पर्यंत नेली जाईल. २०२९ च्या संसदीय निवडणुकांपूर्वी महिला आरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ही वाढ केली जाईल.




# अक्षय तृतीयेलाच्या मुहूर्तावर जर्मनीत माऊली आणि तुकोबांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा

**पुणे, ता. १७ :** जर्मनीमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा १९ एप्रिल २०२६ रोजी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर होणार आहे. ख्रिसचेम येथील श्री विठ्ठलधाम मंदिरात हा सोहळा पार पडणार असून, आळंदी आणि देहू येथून संस्थानचे विश्वस्त आणि वारकरी या कार्यक्रमासाठी जर्मनीला रवाना झाले आहेत.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंती वर्ष आणि संत तुकाराम महाराजांच्या ४५० व्या वैकुंठगमन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे. १९ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत कीर्तनकार डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे यांचे इंग्रजीतून कीर्तन होणार आहे. त्यानंतर दुपारी १२ ते १२.३० दरम्यान मूर्तींची विधिवत प्राणप्रतिष्ठा केली जाणार आहे.

या सोहळ्यासाठी भजन, कीर्तन आणि प्रवचन अशा कार्यक्रमांचाही समावेश करण्यात आला आहे. संतांच्या विचारांचा आणि साहित्याचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीने दिली आहे.

# अल्पवयीन बालकावर अत्याचार करणाऱ्या नराधमाला ५ वर्षे सक्तमजुरी

## पुणे सत्र न्यायालयाचा मोठा निकाल ; पॉक्सो अंतर्गत आरोपीला १० हजार रुपयांचा दंड

**पुणे, ता. १७ :** विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीतील लोहगाव परिसरात एका अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला श्रीमती एस. एस. सस्ते, विशेष न्यायाधीश (पॉक्सो) यांनी दोषी ठरवून ५ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सज्जन सहेआलम सलमानी (वय २४, रा. संतनगर, लोहगाव, पुणे) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे.



विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत नोव्हेंबर २०२२ मध्ये लोहगाव येथील एअरफोर्स स्टेशन परिसरातील एका सलूनमध्ये ही घटना घडली होती. ७ वर्षे ६ महिने वयाचा पीडित बालक केस कापण्यासाठी सलूनमध्ये गेला असता, तिथे काम करणाऱ्या सज्जन सलमानी याने त्याच्यावर लैंगिक अत्याचार केले होते. याप्रकरणी पीडिताच्या वडिलांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.

विशेष सरकारी अभियोक्ता नितीन कोंगे यांनी मांडलेला युक्तिवाद आणि सादर केलेले पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला पॉक्सो कलम ९ (एम) सह १०, ५ वर्षे सश्रम कारावास आणि दहा हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावासाची शिक्षा ठोठावली होती. तसेच भादवि कलम ५०६ ६ महिने सक्षम कारावास आणि दोन हजार रुपये दंड. दंड न भरल्यास २ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

या गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक मोहन साळवी (सेवानिवृत्त) यांनी केला होता. त्यांना पोलीस हवालदार एस. के डावखर यांनी सहकार्य केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव यांनी या गुन्ह्याला 'दत्तक' घेऊन तपासावर विशेष लक्ष दिले होते. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ ७ चे पोलीस उपआयुक्त सोमय मुंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त खराडी विभाग प्रांजली सोनवणे, विमानतळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव, गुन्हे निरीक्षक शरद शेळकेयांचे मार्गदर्शन लाभले.

दरम्यान, कोर्ट पैरवीसाठी सहाय्यक पोलीस फौजदार विनोद कांबळे, महिला पोलीस अंमलदार व्ही. आर. दुरगुडे, हवालदार शिवराज चव्हाण, टी. एस. गाडेकर आणि महिला पोलीस हवालदार काळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# प्रेमीयुगुलाला लुटणाऱ्या आरोपीच्या बारामती पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**बारामती, ता. १७ :** बारामती तालुक्यातील तांदुळवाडी परिसरात प्रेमी युगलावर कोयत्याने हल्ला करून लूट करणाऱ्या आरोपीला अखेर पोलिसांनी अटक केली आहे. बारामती तालुका पोलिसांच्या सापळ्यात हा आरोपी जेरबंद झाला असून त्याच्याकडून सोन्याची साखळी जप्त करण्यात आली आहे.



ही घटना १६ जून २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ६.४५ वाजण्याच्या सुमारास तांदुळवाडी येथील एलसी कंपनी लेक परिसरात घडली होती. पीडित तरुण (वय २२, रा. मार्केटयार्ड, बारामती) हा आपल्या मैत्रिणीसोबत मोकळ्या जागेत बसला असताना मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्यावर हल्ला केला. आरोपींनी तोंडाला रुमाल बांधून मोबाईल आणि पैसे देण्याची मागणी केली. विरोध केल्याने एका आरोपीने लोखंडी कोयत्याने तरुणाच्या पायावर वार करत त्याला जखमी केले. यानंतर आरोपींनी जबरदस्तीने २५०० रुपये रोख, मोबाईल आणि तरुणीच्या गळ्यातील सुमारे ५०००० रुपये किमतीची सोन्याची साखळी हिसकावून घेतली. तसेच मोटारसायकलची चावी घेऊन ते घटनास्थळावरून पसार झाले होते.

या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या आधारे अजय नंदकुमार सकट (रा. तांदुळवाडी) याला १५ एप्रिल २०२६ रोजी अटक करण्यात आली. त्याच्याकडून सुमारे ४.९०० ग्रॅम वजनाची आणि अंदाजे ५०००० रुपये किमतीची सोन्याची साखळी जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली युवराज पाटील आणि त्यांच्या पथकाने केली. तसेच सुरेंद्र वाघ, भारत खारतोडे, मनोज पवार, नितीन ढवाण, निलेश वाकळे, राजू बन्ने आणि शाहरुख शेख यांनी या कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील आणि राजू बन्ने करत आहेत.

# दौंडमध्ये जुन्या वादातून घरात घुसून मारहाण; तिघांवर गुन्हा दाखल

**दौंड, ता. १७ :** जुन्या भांडणाच्या रागातून एका कुटुंबाला बेदम मारहाण करण्यात आली आहे. दौंड शहरातील वडारगल्ली भागात मंगळवारी (ता. १४) रात्री आठ वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. याप्रकरणी तिघांवर दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रमेश पवार, रमेश काळु पवार (दोघे रा. वडारगल्ली दौंड ता. दौंड) व तुषार मैसु शिवरकर (रा. केडगाव ता. दौंड) असे मारहाण करणाऱ्या तिघांची नावे आहेत. याप्रकरणी पापाबाई सोमा पवार (वय -६०) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी पापाबाई यांचा मोठा मुलगा अशोक, सून मथुरा आणि नातू हरिश हे कामानिमित्त गुजरातमध्ये राहतात. मंगळवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास गुजरातहून दौंडला आपल्या घरी आले होते. ते घरी पोहोचताच काही वेळातच आरोपी आदि पवार, रमेश पवार आणि तुषार शिवरकर हे त्यांच्या घरासमोर आले. त्यांनी जुन्या भांडणाचे कारण काढून शिवीगाळ सुरू केली आणि घरावर दगडफेक केली.

पापाबाई यांनी भीतीपोटी घराचा दरवाजा बंद केला असता, आरोपींनी नातू हरिशला बाहेर काढ, आम्ही तुला काही करणार नाही असे ओरडून सांगितले. तरीही दरवाजा उघडला नाही म्हणून संतापलेल्या तिघांनी दरवाजावर लाथा मारून तो तोडला आणि घरात प्रवेश केला. घरात घुसल्यानंतर आरोपी आदि पवार याने पापाबाई यांच्या डाव्या हातावर लाकडी काठीने जोरात प्रहार केला, ज्यामध्ये त्यांचा हात मनगटात फॅक्चर झाला. त्यानंतर तुषार शिवरकर आणि रमेश पवार यांनी सून मथुरा आणि नातू हरिश यांनाही काठी व दगडाने मारहाण केली. दरम्यान, जीव वाचवण्यासाठी सून आणि नातू घराच्या मागील दरवाजातून पळून गेले. जाता जाता आरोपींनी घराबाहेर उभ्या असलेल्या मोटारसायकलचीही तोडफोड करून नुकसान केले. हल्ल्यानंतर घाबरलेल्या कुटुंबाने पोलीस ठाणे गाठले. वैद्यकीय तपासणी केली असता पापाबाई यांचा हात फॅक्चर असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी दौंड पोलिसांनी वरील तिघांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमिर शेख करत आहेत.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न; लोकसभेत राहुल गांधींचा हल्लाबोल



**नवी दिल्ली, ता. १७ :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी महिला आरक्षण अंमलबजावणीसाठी मांडण्यात आलेल्या विधेयकांवर जोरदार टीका करत केंद्र सरकारवर निशाणा साधला. लोकसभेत चर्चेदरम्यान त्यांनी म्हटले की, हे विधेयक महिलांच्या सक्षमीकरणाशी संबंधित नसून देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे.

लोकसभेत महिलांसाठी २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून आरक्षण लागू करण्याच्या उद्देशाने मांडण्यात आलेल्या तीन विधेयकांवर चर्चा सुरू आहे. यात मतदारसंघ पुनर्रचना विधेयकाचाही समावेश आहे. या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर तीव्र टीका केली. हे महिला आरक्षण विधेयक नाही. याचा महिलांच्या सक्षमीकरणाशी काहीही संबंध नाही. हा देशाचा निवडणूक नकाशा बदलण्याचा प्रयत्न आहे. हे लज्जास्पद आहे, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी जातीय जनगणनेचा मुद्दाही उपस्थित केला. या प्रक्रियेद्वारे जातीय जनगणनेला बायपास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. ओबीसी समाजाला प्रतिनिधित्व देण्यापासून दूर ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे. संसद आणि विधानसभांमधील प्रतिनिधित्वासाठी जातीय जनगणना वापरली जाऊ नये, यासाठीच हा प्रयत्न आहे. त्यामुळे हा मुद्दा पुढील दहा वर्षांसाठी लांबणीवर टाकला जात आहे, असा आरोप त्यांनी केला. राहुल गांधी यांनी पुढे सांगितले की, विरोधक हे तीनही विधेयके मंजूर होऊ देणार नाहीत. महिला आरक्षण लागू करणे सोपे आहे. जुनं विधेयक तात्काळ आणा, आम्ही त्याला लगेच पाठिंबा देऊ. तेच खरं महिला आरक्षण विधेयक आहे. हे काहीतरी वेगळंच आहे, असे ते म्हणाले.

**लहान राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा प्रयत्न**

तसेच त्यांनी भाजप-नेतृत्वाखालील केंद्र सरकारवर सत्तेत राहण्यासाठी देशाचा राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. देशातील राजकारणात आपली ताकद कमी होत असल्याची भीती तुम्हाला वाटते. त्यामुळे तुम्ही संपूर्ण राजकीय नकाशा बदलण्याचा प्रयत्न करत आहात. जम्मू-काश्मीर आणि आसाममध्ये हे आधीच केले आहे आणि आता संपूर्ण देशात तेच करण्याचा विचार आहे, असा आरोप त्यांनी केला.

दक्षिण भारत, ईशान्येकडील आणि लहान राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोपही त्यांनी केला. भाजप सत्तेत राहण्यासाठी या राज्यांचे प्रतिनिधित्व कमी करण्याचा प्रयत्न करत आहे. हा राष्ट्रविरोधी प्रकार आहे. कोणत्याही परिस्थितीत आम्ही हे होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

## शिक्रापूर-चाकण रस्त्यावर भरधाव टेम्पोच्या धडकेत सुरक्षारक्षकाचा मृत्यू

**चाकण, ता. १७ :** शिक्रापूर-चाकण रस्त्यावर जातेगाव खुर्द गावच्या हद्दीत हॉटेल सनीबारसमोर झालेल्या भीषण अपघातात एका कंपनीच्या सुरक्षारक्षकाचा मृत्यू झाला आहे. बाळासाहेब निवृत्ती वाजे (वय-६४, रा. थिटेवाडी केंदूर, ता. शिरूर) असे मृताचे नाव असून, या घटनेमुळे थिटेवाडी परिसरात शोककळा पसरली आहे. बाळासाहेब वाजे हे केंदूर येथील एस. एच. के. ऑटोकम्पेन्ट कंपनीत सुरक्षारक्षक म्हणून कार्यरत होते. गुरुवारी (ता.१६) ते आपल्या दुचाकीवरून शिक्रापूरकडून चाकणकडे चालले असताना, पाठीमागून आलेल्या भरधाव टेम्पोने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत वाजे हे गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

प्राईम लाईफ



## रोज तुळशीची पाने खाण्याचे आरोग्यवर्धक फायदे, जाणून घ्या

आपल्या हिंदुस्थानात तुळशीचे रोप हे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. हे रोप केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नाही. तर तुळशीच्या झाडामध्ये खूप सारे औषधी गुणधर्म दडलेले असतात. म्हणूनच पूर्वापारपासुन दारात किंवा अंगणात तुळस लावण्याची प्रथा रूढ झालेली आहे. तुळशीची पाने रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यास, सर्दी आणि खोकल्यापासून आराम देण्यास आणि पचनक्रिया सुधारण्यास मदत करतात.

दररोज सकाळी रिकाम्या पोटी तुळशीची - पाने खाणे आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. तुळशीमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत जे शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्यास मदत करतात. नियमित सेवनाने पचनसंस्था मजबूत होते, तणाव कमी होतो आणि सर्दी-खोकल्यासारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

तुळशीच्या पानांमध्ये अँटीऑक्सिडंट आणि दाह-विरोधी (अँटी-इन्फ्लेमेटरी) गुणधर्म असतात जे शरीराला संसर्गापासून वाचवण्यास मदत करतात. विशेषतः, तुळशीच्या पानांमध्ये असलेले युजेनॉल घसादुखी, खोकला आणि दम्यापासून आराम देण्यास मदत करते. शिवाय, ते श्वसनसंस्था मजबूत करते आणि बदलत्या हवामानामुळे होणाऱ्या आजारांना प्रतिबंध करते.

तुळस कोणते आजार बरे करते? : तुळस पचनासाठी देखील खूप फायदेशीर आहे. ती पाचक एन्झाइम्सना सक्रिय करते, ज्यामुळे गॅस, अपचन आणि आम्लपित्तासारख्या समस्या कमी होतात. दररोज त्याचे सेवन केल्याने पोट हलकेआणि निरोगी राहते.

तुळस मानसिक आरोग्यासाठी एक नैसर्गिक उपाय म्हणूनही ओळखली जाते. ती एक अॅडाप्टोजेन म्हणून काम करते, शरीराला तणावाचा सामना करण्यास मदत करते आणि मनाला शांत करते. तिच्या सेवनाने मानसिक थकवा कमी होतो आणि एकाग्रता वाढते.

तुळशीचे रक्तातील साखर आणि हृदयाच्या आरोग्यावरही सकारात्मक परिणाम दिसून आले आहेत. ती रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यास मदत करू शकते, ज्यामुळे हृदयाचे आरोग्य राखले जाते.

# कदमवाकवस्ती येथील स्वप्नील कदम आणि इजाज खान चिमुकल्यासाठी ठरले देवदूत

**लोणीकाळभोर, ता. १७:** रात्रीचे साडेअकरा वाजले होते सगळीकडे शांतता पसरली होती. पण त्या शांततेत एक छोटासा जीव भीतीच्या अंधारात हरवला होता. अवघा तीन वर्षांचा चिमुकला, खेळता खेळता घराच्या पहिल्या मजल्यावरून खाली उतरला पण परत घरी जाण्याचा रस्ता त्याला सापडेनासा झाला. निरागस पावलांनी तो थेट पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या सेवा रस्त्यावर धावत सुटला जिथे क्षणात काहीही अनर्थ घडू शकला असता!

याच वेळी, कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील दोन हॉटेल व्यावसायिक स्वप्नील कदम आणि इजाज खान हे आपले हॉटेल बंद करून बुधवारी (ता. १६) रात्री घरी जात होते. अचानक त्यांच्या नजरेस तो चिमुकला पडला अंधारात, रस्त्यावर, एकटाच धावताना! त्यांनी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला पण चिमुकला अजूनच घाबरून धावू लागला. परिस्थितीची गंभीरता ओळखून त्यांनी गोड मार्ग निवडला, चल, चॉकलेट देतो चिप्स देतो या निरागस आमिषाने चिमुकल्याचे पाऊल अखेर थांबले.



त्याच्याशी गोड बोलत नाव विचारले पण तो काहीच सांगू शकत नव्हता. वेळ न दवडता त्यांनी लोणी काळभोर पोलिसांना माहिती दिली. क्षणाचाही विलंब न करता पोलीस अंमलदार महेंद्र आगळे आणि गायकवाड घटनास्थळी दाखल झाले. परिसरात शोधमोहीम सुरू झाली आणि अखेर रात्री बारा वाजण्याच्या सुमारास त्या चिमुकल्याच्या आई-वडिलांचा शोध लागला! आई-वडिलांची अवस्था शब्दांत सांगता येणार नाही अशी झाली होती मुलगा सापडत नव्हता, काळजीने जीव कासावीस झाला होता. पण जेव्हा त्यांनी आपल्या चिमुकल्याला सुरक्षित पाहिले, तेव्हा त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू दाटले.

पोलिसांनी खात्री करून चिमुकल्याला त्याच्या आई-वडिलांच्या स्वाधीन केले आणि एका संभाव्य दुर्घटनेचा शेवट सुखरूप झाला. या संपूर्ण घटनेत स्वप्नील कदम आणि इजाज खान यांनी दाखवलेली सतर्कता आणि माणुसकी खरोखरच कौतुकास्पद आहे.


त्यांच्या एका क्षणाच्या जागरूकतेमुळे एक निरागस जीव वाचला आज लोणी काळभोरमध्ये या दोघांचे सर्वत्र कौतुक होत आहे कारण त्या रात्री, ते फक्त हॉटेल चालक नव्हते तर एका चिमुकल्यासाठी ते खरेच देवदूत ठरले!

## राज्यात एसटीची १० टक्के भाडेवाढ लागू

**पुणे, ता. १७ :** उन्हाळी सुट्ट्यांमध्ये गावी जाण्याचे नियोजन करणाऱ्या सर्वसामान्यांच्या बजेटला आता कात्री लागणार आहे. दरवर्षी उन्हाळी सुट्ट्यांमध्ये प्रवाशांची संख्या प्रचंड वाढते. या वाढीव गर्दीचा लाभ उठवण्यासाठी आणि महामंडळाची आर्थिक तूट भरून काढण्यासाठी एसटी दरवर्षी 'हंगामी भाडेवाढ' करते. यंदाही १५ जूनपर्यंत हा वाढीव दर लागू राहील. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) १५ एप्रिल ते १५ जून या ऐन गर्दीच्या हंगामात तिकीट दरात १० टक्क्यांची वाढ जाहीर केली आहे. इतकेच नव्हे, तर प्रत्येक तिकिटावर २ रुपये स्वच्छता अधिभार देखील वसूल केला जाणार आहे.

विशेष म्हणजे, ज्या प्रवाशांनी आधीच 'अॅडव्हान्स बुकिंग' केले आहे, त्यांनाही सुटका नाही. अशा प्रवाशांना प्रवासादरम्यान कंडक्टरकडे भाड्यातील फरकाची रक्कम भरावी लागणार आहे. ही दरवाढ प्रामुख्याने ग्रामीण भागाची वाहिनी असलेल्या 'लाल परी' (साधी बस) आणि निमआराम (एशियाड) गाड्यांसाठी आहे. मात्र, मध्यमवर्गीय आणि उच्चभ्रू प्रवाशांना दिलासा देत महामंडळाने शिवनेरी, शिवशाही, हिरकणी, आणि ई-बस (शिवाई) या सेवांना या दरवाढीतून वगळले आहे.

अमृत ज्येष्ठ नागरिक (७५ वर्षांवरील मोफत प्रवास) आणि महिला सन्मान योजना (५०% सवलत) या सवलती वाढीव दरावरही लागू राहतील, त्यामुळे पात्र प्रवाशांनी याचा लाभ घ्यावा. एसटी महामंडळाने जरी ही वाढ सेवा सुधारण्यासाठी असल्याचे म्हटले असले, तरी प्रवाशांच्या मते हा निर्णय उन्हाळ्याच्या सुट्टीत आनंदावर विरजण घालणारा आहे.




## पुण्यातील जुन्या इमारती पाडण्यापूर्वी आता 'ना-हरकत प्रमाणपत्र' अनिवार्य

**पुणे, ता. १७ :** शहरातील जुन्या इमारतींच्या पाडकामादरम्यान होणारे अपघात आणि शेजारील रहिवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पुणे महानगरपालिकाने नवी नियमावली जाहीर केली आहे. या नियमांनुसार पाडकाम करण्यापूर्वी विविध परवानग्या आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना अनिवार्य करण्यात आल्या आहेत.


महापालिकेने जाहीर केलेल्या नियमांनुसार, इमारत पाडण्यापूर्वी संबंधित विभागाची लेखी पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असेल. पाडकाम करणाऱ्या सोसायटी किंवा विकासकांनी शेजारील इमारतींचे पदाधिकारी, स्थानिक पोलीस, अग्निशमन दल आणि महावितरण अधिकाऱ्यांचे संपर्क तपशील उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. तसेच प्रॉपर्टी टॅक्स आणि पाणीपुरवठा विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) घेणेही अनिवार्य करण्यात आले आहे.

पाडकामामुळे शेजारील इमारतींना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यास त्या इमारती रिकाम्या करण्याची जबाबदारी संबंधित विकासक आणि सोसायटीवर टाकण्यात आली आहे. पाडकामाची संपूर्ण प्रक्रिया सुरक्षित आणि पारदर्शक राहावी यासाठी महापालिकेकडून देखरेख ठेवली जाणार आहे. पुण्यात पुनर्विकासाच्या कामांदरम्यान शेजारील इमारतींना तडे जाणे किंवा अपघात होण्याच्या घटना घडत असल्याच्या पार्श्वभूमीवर ही नियमावली लागू करण्यात आली आहे.

# पुण्यातील खडकीत घटस्फोटाच्या वादातून पत्नीवर जीवघेणा हल्ला

**पुणे, ता. १७ :** पुण्यातील खडकी परिसरात घटस्फोटाच्या वादातून पत्नीवर जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. जयंती कार्यक्रमादरम्यान घडलेल्या या प्रकारात महिलेवर धारदार हत्याराने वार करण्यात आले असून ती गंभीर जखमी झाली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पतीला अटक केली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव राहुल महादेव कांबळे (वय ३०) असे आहे. तर जखमी महिलेचे नाव सायली सयाजी भिसे (वय २२) असे आहे. सायली यांनी या प्रकरणी खडकी पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सायली आणि राहुल यांचा काही महिन्यांपूर्वी आळंदी येथे विवाह झाला होता. मात्र वैवाहिक वादामुळे दोघे वेगळे राहत होते आणि त्यांचा घटस्फोटाचा खटला न्यायालयात सुरू आहे. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त औंध रोडवरील कार्यक्रमाला सायली मैत्रिणीसोबत गेली होती. कार्यक्रम संपल्यानंतर रात्री सुमारे ११.४५ वाजता घरी जात असताना आरोपी राहुल त्यांच्या समोर आला.

यावेळी त्याने सायली यांच्यावर मारहाण सुरू केली. त्यांनी प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने चाकूसदृश धारदार हत्याराने कपाळ, गाल, खांदा, पाठ आणि ओठाखाली वार केले. या हल्ल्यात सायली गंभीर जखमी झाली.

सायली यांनी आरोप केला आहे की, आरोपीला अटक करण्यात आली असली तरी त्याच्यावर कठोर कारवाई झालेली नाही. तसेच त्याला कोणाचा तरी पाठिंबा मिळत असल्याचा संशयही त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# भोंदू खरातचा उजवा हात असलेल्या डॉ. शेळकेंचा अपघातात मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर, ता. १७ :** वादाच्या भोवऱ्यात अडकलेला भोंदू बाबा अशोक खरात याच्या अडचणीत वाढ झाली आहे. खरातचा सर्वात विश्वासू सहकारी आणि आर्थिक व्यवहारांतील मुख्य भागीदार डॉ. जितेंद्र शेळके यांचा समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात मृत्यू झाला. धोत्रे गावाजवळ संभाजीनगरहून शिर्डीच्या दिशेने जात असताना उभ्या कंटेनरला त्यांच्या कारने पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात शेळके यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांची पत्नी आणि मुलगा मृत्यूशी झुंज देत आहेत.



मुख्य भागीदार डॉ. जितेंद्र शेळके भोंदू बाबा अशोक खरातला अटक झाल्यापासून प्रचंड मानसिक दडपणाखाली होते. खरातच्या 'शिवनिका ट्रस्ट'चे उपाध्यक्ष म्हणून ते काम पाहत होते. खरातने हडपलेल्या जमिनी आणि कोट्यवधींच्या बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांत शेळकेंचा सक्रिय सहभाग असल्याचा आरोप होता. त्यांची चौकशी करावी, अशी मागणी जोर धरत होती.

समृद्धी महामार्गावरील हा अपघात इतका भीषण होता की, कारचा पुढचा भाग अक्षरशः चिरडून कंटेनरमध्ये घुसला होता. दिवसाढवळ्या उभ्या असलेल्या कंटेनरला अशी जोरात धडक बसल्याने अनेकांना धक्का बसला आहे. खरातच्या अटकेनंतर या प्रकरणातील हा सर्वात मोठा 'टर्निंग पॉईंट' मानला जात असून, आता पोलीस डॉ. शेळकेंच्या कॉल रेकॉर्ड्सचीही पडताळणी करण्याची शक्यता आहे.

# आईला वाचवायला गेलेल्या मुलाच्या डोक्यात वडिलांनी घातला लोखंडी तवा

**फुरसुंगी, ता. १७ :** घरगुती वाद इतका टोकाला गेला की, आईला मारहाण होताना थांबवण्यासाठी गेलेल्या मुलालाच गंभीर जखमी व्हावे लागल्याची धक्कादायक घटना फुरसुंगी (ता. हवेली) परिसरात बुधवारी (ता. १५) रात्री सुमारे सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या प्रकरणी वडिलांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आर्यन प्रभाकर टिळेकर (वय २३) हा भेकराईनगर येथील रहिवासी असून तो मांजरी येथील लॉ कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. आर्यन हा बुधवारी घराबाहेर पार्किंगमध्ये असताना घरातून आई-वडिलांच्या भांडणाचा आवाज ऐकू आला. तो तत्काळ घरात गेला असता, त्याचे वडील प्रभाकर टिळेकर हे त्याची आई मनिषा यांना मारहाण करत असल्याचे त्याने पाहिले. हे भांडण सोडवण्यासाठी आर्यन मध्ये पडला. मात्र, संतापाच्या भरात वडिलांनी किचनमधील लोखंडी तवा त्याच्या डोक्यात मारला. या हल्ल्यात आर्यनच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यातून रक्तस्राव सुरू झाला. त्याला तातडीने ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याच्या डोक्याला सहा टाके घातले. याशिवाय, वडिलांनी शिवीगाळ करत मारून टाकीन अशी धमकीही दिली आहे. उपचारानंतर प्रकृती सुधारल्यावर आर्यनने फुरसुंगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी पोलिसांनी प्रभाकर टिळेकर (वय ५४) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ च्या कलम ११८ (१), ११५ (२), ३५२ व ३५१ (२) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

# इस्त्रायल-लेबनॉनमध्ये १० दिवसांचा युद्धविराम

## डोनाल्ड ट्रम्प यांची घोषणा

**नवी दिल्ली, ता. १७ :** पश्चिम आशियातील स्थिती निवळण्याच्या दृष्टीने गुरूवारी महत्वाची घडामोड घडली. इस्त्रायल आणि लेबनॉनमध्ये १० दिवसांच्या युद्धविरामावर सहमती झाली. त्याविषयीची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली. इस्त्रायल आणि इराणचे समर्थन असणाऱ्या हिज्बुल्लाह दहशतवादी संघटनेत काही काळापासून संघर्ष सुरू आहे. त्यातून इस्त्रायलकडून हिज्बुल्लाहच्या लेबनॉनमधील ठिकाणांना लक्ष्य केले जात आहे. तो संघर्ष थांबवण्याच्या उद्देशातून इस्त्रायल आणि लेबनॉनच्या राजदूतांमध्ये अमेरिकेत दोन दिवसांपूर्वी चर्चा झाली. ती चर्चा फलदायी ठरल्याचे दिसून येत आहे.



आता इस्त्रायल आणि लेबनॉनने तात्पुरत्या युद्धविरामाची तयारी दर्शवली आहे. तो निर्णय तातडीने लागू करण्यात आला. दोन्ही देशांतील युद्धविरामाच्या सहमतीला बळकटी देण्यासाठी ट्रम्प प्रयत्नशील आहेत. त्यांनी इस्त्रायल आणि लेबनॉनच्या नेत्यांना चर्चेसाठी येण्याचे निमंत्रण दिले आहे. ते स्वीकारले गेल्यास इस्त्रायल, लेबनॉनमध्ये वर्ष १९८३ नंतर प्रथमच उच्चस्तरीय चर्चा होईल.

दरम्यान, त्यातून युद्धविरामाला बळकटी मिळण्याची चिन्हे आहेत. संघर्षामुळे लेबनॉनमधील लाखों लोक विस्थापित झाले आहेत. त्यांना टिकाऊ स्वरूपाच्या युद्धविरामामुळे मोठा दिलासा मिळू शकेल.

# लॉजवर सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायाचा पर्दाफाश

## बांगलादेशी महिलेसह ९ महिलांची सुटका

**पिंपरी, ता. १७ :** पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने चिखली परिसरातील एका लॉजवर धडक कारवाई करत देहविक्री व्यवसायाचा पर्दाफाश केला आहे. या छाप्यात पोलिसांनी नऊ पीडित महिलांची सुटका केली असून, यामध्ये बांगलादेशातून तस्करी करून आणलेल्या एका महिलेचाही समावेश आहे.




अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष आणि दहशतवाद विरोधी कक्षाने १३ एप्रिल रोजी रात्री ११ वाजताच्या सुमारास ही कारवाई केली. देहू-आळंदी रोडवरील एका लॉजमध्ये लॉजच्या नावाखाली देहविक्रीचा व्यवसाय सुरू असल्याचे पोलिसांना माहिती मिळाली. त्यानुसार कारवाई करत लॉज व्यवस्थापक अशोक बाबुराव बाबर आणि कामगार अकिबुल खालेक मुल्लायांना पोलिसांनी अटक केली आहे. लॉज चालक, जागा मालकाविरोधात चिखली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता आणि पिटा कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

सुटका करण्यात आलेल्या ९ महिलांपैकी एका महिलेला आरोपींनी बांगलादेशातून तस्करी करून भारतात आणले होते. पोलिसांनी या पीडित महिलेची सुटका केली असून, तिला पुन्हा मायदेशी पाठवण्याची प्रक्रिया पोलीस प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने सन २०२६ मध्ये आतापर्यंत एकूण ११ ठिकाणी छापे टाकले आहेत. यामध्ये सात मसाज पार्लर, स्पा आणि चार हॉटेल्सचा समावेश आहे. या सर्व कारवायांमध्ये आतापर्यंत ३१ आरोपींना अटक करण्यात आली असून २८ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.